प्रभात
www.dainikprabhat.com

# विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेचे धडे

## सायबर योद्धा क्लबचा जनजागृती उपक्रम



**पिंपळे गुरव, दि. ११ (वार्ताहर)** - वाढत्या सायबर गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने डॉ. डी. वाय. पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पिंपरीच्या १क्विक हील फाउंडेशन सायबर योद्धा क्लबतर्फे माध्यमिक विद्यालय, पिंपळे गुरव येथे सायबर जनजागृती सत्र घेण्यात आले. या सत्रात सुमारे २०० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

सायबर सुरक्षेसाठी सायबर शिक्षण या अभियानांतर्गत तसेच १माझा डेटा, माझी जबाबदारी या संकल्पनेवर आधारित या सत्रात सायबर योद्धे सोहम सोनावणे आणि सिद्धलक्ष्मी पाल यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. ऑनलाइन फसवणूक, एकवेळचा संकेतांकाद्वारे होणारी फसवणूक, समाजमाध्यमांची सुरक्षितता, समाजमाध्यम खाते हॅक होणे, व्हॉट्सॲपद्वारे होणारी फसवणूक, बनावट समाजमाध्यम खाती आणि सायबर छळ यांसारख्या विषयांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

सायबर फसवणूक झाल्यास तातडीने राष्ट्रीय सायबर हेल्पलाइन क्रमांक १९३० वर संपर्क साधावा तसेच राष्ट्रीय सायबर गुन्हे नोंदणी संकेतस्थळावर तक्रार नोंदवावी, याबाबत विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. या कार्यक्रमास माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक पांडुरंग शंकर मुडगुण यांची प्रमुख उपस्थिती होती. विद्यालय प्रशासनाच्या सहकार्याने हा उपक्रम पार पडला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रणजित पाटील आणि क्लबचे महाविद्यालयीन समन्वयक प्रा. सत्यवान कुंजीर यांचे मार्गदर्शन लाभले.